**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १४

**सभावृत्तांत**

**दिनांक – १४/०२/२०२०** **वेळ – दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षीक सभा **शुक्रवार** दिनांक **१४/०२/२०२०** रोजी **दुपारी ३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.तुषार रघुनाथ हिंगे - सभापती**

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**सभापती -** आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसल्याने **शुक्रवार** दिनांक **२८/०२/२०२०** रोजी दुपरी **२.४५** वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( तुषार रघुनाथ हिंगे )**
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १४

**सभावृत्तांत**

**(दिनांक १४/०२/२०२० ची तहकूब सभा)**

**दिनांक – २८/०२/२०२०** **वेळ – दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक १४/०२/२०२० रोजीची तहकूब सभा **शुक्रवार** दिनांक **२८/०२/२०२०** रोजी **दुपारी २.४५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.तुषार रघुनाथ हिंगे - सभापती**

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**सभापती -** आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसल्याने **शुक्रवार** दिनांक **१३/०३/२०२०** रोजी दुपरी **२.४५** वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( **तुषार रघुनाथ हिंगे** )

**सभापती**

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १४

**सभावृत्तांत**

**(** दिनांक १४/०२/२०२० व २८/०२/२०२० ची तहकूब सभा **)**

दिनांक – **१३/०३/२०२०** वेळ - दुपारी ४**.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा,कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक **२८/०२/२०२०** ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक **१३/०३/२०२०** रोजी दुपारी २**.४५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.तुषार रघुनाथ हिंगे - सभापती**
२. मा.अभिषेक गोविंद बारणे
३. मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन
४. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
५. मा.सागर बाळासाहेब गवळी

या शिवाय मा.खोत – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

अ) दिनांक १०/०१/२०२० व दि.२४/१/२०२० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१२) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक २४/०१/२०२० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ७७ विषय क्रमांक – ०१
दिनांक – १३/०३/२०२० विभाग – ह क्षेत्रीय कार्यालय
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त(२) यांचे पत्र क्र.हक्षेका/सावा/प्रशा/कावि/७२/२०१९ दि.१९/११/२०१९

मा. अतिरिक्त आयुक्त(२) यांची शिफारस विचारात घेऊन –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन सार्वजनिक वाचनालय हे सोहम लायब्ररी यांना करारनामा करून दि.०१.०९.२०१९ ते ३१.०७.२०२० अखेर ११ महिने कालावधीकरीता प्रतिमहा र.रू.१०,०००/- मानधनवर चालविण्यास देणेस व येणा-या खर्चास् मान्यता देणेत येत आहे.

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

ठराव क्रमांक – ७८ विषय क्रमांक – ०२
दिनांक – १३/०३/२०२० विभाग - क्रीडा
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सागर गवळी
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/११/२०२० दि.०१/०२/२०२०

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.स्थायी समिती सभा सदस्य ठराव क्र ४५७२ दि.२८/०२/२०१९ अन्वये मा आयुक्त यांचेकडील आदेश क्रमांक क्रीडा/०३/कावि/२५८/२०१९ दि.२६/०६/ २०१९ अन्वये प्रभाग क्र १४ येथील प्रबोधनकार ठाकरे फिटनेस सेंटर व्यायामशाळा हि अष्टविनायक महिला प्रतिष्ठाण या संस्थेस सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास दिलेल्या व्यायामशाळेची मुदत दि.१०/०२/२०२० रोजी संपुष्टात येत आहे.प्रभाग क्र १४ येथील प्रबोधनकार ठाकरे फिटनेस सेंटर व्यायामशाळा हि अष्टविनायक महिला प्रतिष्ठाण या संस्थेस दि.१२/०२/२०२० पासून पुढे व्यायामशाळा ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रू.२०००/- मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देण्यास मुदतवाढ देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

----------

ठराव क्रमांक – ७९ विषय क्रमांक – ०३
दिनांक – १३/०३/२०२० विभाग - क्रीडा
सुचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४८/२०२० दि.०१/०२/२०२०

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.स्थायी समिती सभा सदस्य ठराव क्र ४५७४ दि.२८/०२/२०१९ अन्वये मा आयुक्त यांचेकडील आदेश क्रमांक क्रीडा/०३/कावि/२५७/२०१९दि. २६/०६/२०१९ अन्वये प्रभाग क्र ९ खराळवाडी येथील बालभवन पुरूष व्यायामशाळा हि कामगार नगर मित्र मंडळ कामगार नगर पिंपरी १७ या संस्थेस सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास दिलेल्या व्यायामशाळेची मुदत दि.३१/०१/२०२० रोजी संपुष्टात येत आहे.संस्थेने दि.०६/०१/२०२० च्या अर्जाच्या मागणीनुसार व क्रीडा पर्यवेक्षिका क क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील अहवालनुसार प्रभाग क्र ९ खराळवाडी येथील बालभवन पुरूष व्यायामशाळा हि कामगार नगर मित्र मंडळ कामगार नगर पिंपरी १७ या संस्थेस दि.०२/०२/२०२० पासून पुढे व्यायामशाळा ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रू.२०००/- मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देण्यास मुदतवाढ देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( तुषार रघुनाथ हिंगे )**
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१५२/२०२०
दिनांक : १३/०३/२०२०



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.